# ४. भारतीय कलांचा इतिहास

* कला म्हणजे काय? - स्वतःला आलेले अनुभव, त्यातून प्राप्त झालेले ज्ञान, मनातील भावभावना इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी जेव्हा एखादी सौंदर्यपूर्ण कृती केली जाते तेव्हा तिला कला असे म्हणतात.

* **दृककला आणि ललित कला:-** कलाप्रकारांची दृककला आणि ललित कला अशी विभागणी केली जाते. ललित कलांना आंगिक कला असेही म्हणतात. दृककलांचा उगम प्रागैतिहासिक काळात झाला. उदा:- अश्मयुगीन गुहा.

* **लोककला आणि अभिजात कला:-** कलेच्या दोन परंपरा आहेत 1) लोककला 2) अभिजात कला.

1**) लोककला:**- अश्मयुगीन काळापासून लोककला चालत आलेली आहे. लोककलेची अभिव्यक्ती उत्स्फूर्त असते. तिची निर्मिती समूहातील लोकांच्या प्रत्यक्ष सहभागातून होते.

2**) अभिजात कला:**- ही प्रमाणित नियमांच्या चौकटीत बांधलेली असते. प्रशिक्षण घेऊनच ही कला आत्मसात करता येते .

*** कलाशैली:-** प्रत्येक कलाकाराची कलेच्या निर्मितीमध्ये स्वतंत्र शैली असते. त्या शैलीच्या आधारे त्या त्या संस्कृतीमधील कलेच्या इतिहासाचा अभ्यास करता येतो.

* **भारतातील दृक्ककला परंपरा:**- दृक्कलांमध्ये चित्रकला व शिल्पकला यांचा समावेश होतो. शिलाखंड , कागद, भिंती, सुती व रेशमी कापडाचे फलक, मातीची भांडी इत्यादींवर चित्रे रेखाटली जातात .

*** लोकचित्रकला शैली:**- अश्मयुगीन गुहाचित्रांमध्ये लोकचित्रकला शैली दिसते. पुराश्मयुग ते शेतीची सुरुवात होइपर्यंतच्या काळापर्यंत या चित्रांची शैली, त्यांचा विषय यात बदल झालेले दिसतात. रेखाटनाच्या पध्दतीत, वापरलेल्या रंगांमध्ये फरक झालेले दिसतात. काळा,लाल,पांढरा हे नैसर्गिक द्रव्यांपासून तयार केलेले रंग ते वापरताना दिसतात.

या चित्रांद्वारे त्या काळातील लोकांचे आपल्या परिसराबद्दलचे ज्ञान कळते तसेच नैसर्गिक स्तोत्राचा उपयोग करून वापरलेले तंत्रज्ञान दिसते. घरातील लग्नकार्यात,सणासुदीला भिंतीवर चित्रं काढणे, रांगोळी काढणे,चित्राच्या साहाय्याने व्याख्याने सांगणे,यातून विविध चित्रशैली विकसित झाल्या .

**अभिजात चित्रकला** : चित्रकलेचा उल्लेख आलेख्यमं किंवा आलेख्य विद्या या नावाने केलेला आहे. आलेख्य विद्येचे सहा पैलू आहेत. रुपभेद , प्रमाण, भाव, लावण्ययोजन, सादृश्यता, वर्णिकाभंग हे ते पैलू धार्मिक ग्रंथाचे

आगम ग्रंथ, पुराणे वास्तुशास्त्रावरील ग्रंथ यामधून,चित्रकला व शिल्पकला यांच्या संबंधीचा विचार आलेला आहे - मंदिर बांधण्यासंदर्भातील तो आहे.

* **हस्तलिखितांमधील लघुचित्रे:**

हस्तलिखातांमधील लघुचित्रावर प्रथम पार्शियन शैलीचा प्रभाव दिसतो. दक्षिणेकडील मुस्लीम राजवटीचा आश्रयाखाली दख्खनी लघुचित्रे शैली विकसित झाली.मुघल सम्राट अकबरच्या कारकिर्दीत मुघल चित्रशैलीचा उदय झाला.

* **युरोपीय चित्रशैली:** ब्रिटिश राजवटीत पाश्चात्त्य चित्रशैलीचा चित्रण हे पाश्चात्त्य चित्रशैलीचे वैशिष्ट्य समजले जाते.

* **शिल्पकला:** शिल्पकला त्रिमितीय असते. शिल्प कोरली किंवा घडवली जातात. त्यासाठी दगड, धातू, माती वापरतात. उदा कैलास लेणी.

*** लोकशिल्पकला शैली** – शिल्पकलाही अश्मयुगीन काळाइतकी प्राचीन आहे. प्राचीन हत्यारे बनवण्याची सुरुवात म्हणजे शिल्पकलेचीच सुरुवात होती. हडप्पा संस्कृती काळापासून चालत आलेल्या मातीच्या मूर्तीची पूजा आजतागायत सुरू आहे . उदा; गणेशमूर्ती,गौरीचे मुखवटे इ. या गोष्टी शिल्पकलेच्या लोकपरंपरेची साक्ष देतात.

**अभिजात शिल्पकला शैली:** हडप्पा संस्कृतीतील दगडी, कांस्य पुतळे यामुळे पाच हजार व त्याहून अधिक वर्षाची ही शिल्पकला प्राचीन आहे. कोरीव दगडी शिल्पनिर्मिती सम्राट अशोकाच्या काळापासून झाली. उदा. सांची येथील स्तूप. बौद्ध धर्माचा प्रचार भारताबाहेर झाल्याने तेथेही स्तूप उभारले गेले. उदा. इंडोनेशियातील बोरोबुदुर येथील स्तूप.

**भारतीय मूर्तीविज्ञान :** इ. स पूर्वी अफगाणिस्तान व आसपासच्या प्रदेशात ग्रीक पार्शियन प्रभाव दर्शवणारी गांधार शिल्पकला उदय पावली. इ. स १ ते तिसऱ्या शतकात म्हणजे कुशाण काळात मधुरा शिल्पशैली उदयाला आली. यामुळे भारतीय मूर्तीविज्ञानाचा पाया घातला गेला. गुप्त साम्राज्यात मूर्तीविज्ञानाचे नियम तयार होऊन शिल्पकलेचे मापदंड निर्माण झाले. इ.स ९ ते १३ व्या शतकात (चौळ घराणे) कांस्य मूर्ती घडवल्या गेल्या.

**स्थापत्य आणि शिल्पकला:** इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकात कोरीव लेण्यांची परंपरा सुरू झाली. तेथील प्रवेशद्वार, आतील खांब, मूर्ती हे शिल्पकलेचे उत्तम नमुने आहेत. उदा. अजिंठा, वेरूळ लेणी. इ.स च्या चौथ्या शतकात (गुप्त साम्राज्य) मंदिर स्थापत्यांची सुरुवात झाली.. इ. स आठव्या शतकात मंदिर स्थापत्य पूर्ण विकसित झाले होते. उदा. कैलास मंदिर. मध्ययुगीन काळापर्यंत मंदिर स्थापत्यांच्या अनेक

शैली विकसित झाल्या. उदा. शिखरांच्या रचना, उत्तर भारतातील नांगर व दक्षिण भारतातील द्राविड या दोन शैली प्रमुख मानल्या जातात. यातून वेसर नावाची मिश्र शैली निर्माण झाली.

महाराष्ट्रात भूमिज शैली आढळते. मध्ययुगीन भारतामध्ये मुस्लीम आश्रयाखाली पर्शियन, मध्य आशियाई. अरबी, इस्लाम पूर्व भारतीय असे स्थापत्य शैलीचे अनेक प्रवाह एकत्र आले. त्यातून मुस्लीम स्थापत्य विकसित झाले.

उदा. कुतूबमिनार, ताजमहल, गोलघुमट.

- भारतीय ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर एक नवीन स्थापत्यशैली उद्याला आली. तिला इंडो –गोथिक स्थापत्त्यशैली असे म्हटले जाते .
- उदा. ब्रिटिश काळातील चर्च, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस.
- भारतातील ललित कला / आंगिक कला परंपरा –
- लोककलेच्या परंपरा –भारतातील लोककला धार्मिक उत्सव आणि सामाजिक जीवन याचा एक अविभाज्य भाग म्हणून विकसित झाल्या.
- उदा. कोळी नृत्य, तारपा नृत्य, पोवाडा, कीर्तन, गोंधळ इ .
- **अभिजात कलेच्या परंपरा –**
- भारताला अभिजात कलांचाही समृद्ध वारसा लाभलेला आहे. भरतमुनीचा 'नाट्यशास्त्र' हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. भारतीय ललित कलांमध्ये नऊ रसांचा परिपोष झालेला दिसतो. भारतीयांचा इतर देशांशी संपर्क आल्याने त्याच्या कलांमध्ये अनेक प्रवाह मिसळले. त्यामुळे भारतीय कला अधिकाधिक समुद्ध झाल्या. उदा. शास्त्रीय गायन, वादन, नृत्य यांच्या विविध शैली निर्माण झाल्या. त्या शैलीचे जतन करणारी घराणी निर्माण झाली.
- भारतात हिंदुस्थानी संगीत व कर्नाटक संगीत अशा शास्त्रीय गायनाच्या दोन प्रमुख शाखा आहेत .
- उत्तर भारत –कथ्थक, महाराष्ट्रात –लावणी, ओडिसा -ओडिसी, तमिळनाडूचे – भारतनाट्यम, आंध्र– कुचिपुडी, केरळ–कथ्थकली, या नृत्यशैलीच्या सादरी करण्यात शास्त्रीय गायन , वादन , नृत्य यांच्या सुरेख मेळ दिसतो. शास्त्रीय संगीत, नृत्य सामान्य रसिकांपर्यत पोचावे या दृष्टीने संगीत नृत्याचे महोत्सव केले जातात .
- पाश्चात्त्य संगीत पाश्चात्त्य नृत्य याचा मेळ भारतीय संगीताशी घालण्याचा प्रयत्न दिसतो. त्यामुळे नवीन शैली विकसित होते .

या क्षेत्रांमध्ये तांत्रिक व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था भारतात आहेत. उदा. नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ डिझाईन, अहमदाबाद.

उदा :-उदय शंकर यांनी भारतीय शास्त्रीय नृत्य व युरोपीय रंगभूमीवरील नृत्यनाट्य यांचा मेळ साधला. त्यात त्यांनी लोकनृत्याच्या विविध शैलींनाही स्थान दिले.

*कला, उपयोजित कला आणि व्यावसायिक संधी :- 1) कलेच्या इतिहासाचे अभ्यासक पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करू शकतात.

2) कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ञांची आवश्यकता असते कारण कला वस्तूचे मूल्य ठरवते, ती नकली नाही ना हे पारखणे आवश्यक असते.

3) सांस्कृतिक वारसा जतन, संवर्धन, सांस्कृतिक पर्यटन ही आता नव्याने विकसित होणारी क्षेत्रे आहेत. या क्षेत्रातही कलेच्या अभ्यासकांना व्यावसायिक संधी मिळतात.

उदा :- संग्रहालय, अभिलेखागार, ग्रंथालय, पुरातत्त्वीय संशोधन इत्यादी .

*उपयोजित कला:- कलात्मक रचना, उपयुक्तता यांची सांगड यातून अनेक प्रकारची निर्मिती केली जाते. उपयुक्तता हा हेतू ठेवून कला निर्मिती करणे म्हणजे उपयोजित कला .

1) औद्योगिक व जाहिरात क्षेत्र, गृहसजावट, सजावटीच्या वस्तू, रंगमंचावरील नेपथ्य, चित्रपट, दूरदर्शन वरील कार्यक्रम यासाठी करावे लागणारे कलादिग्दर्शन, प्रकाश, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांची मांडणी, सजावट व सुलेखन, भेटकार्डे इत्यादी उपयोजित कला क्षेत्रातील जाणकारांची आवश्यकता असते.

2) स्थापत्य व छायाचित्रण ही क्षेत्रही उपयोजित कला या सदरात येतात. संगणकावर केलेली स्थिर - चलत चित्रे, दागदागिने, मातीची भांडी, काचेच्या वस्तू, वस्त्रे इत्यादी. यासाठी प्रशिक्षण दिले जाते .प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात कलावस्तूंच्या उत्पादन प्रक्रियेचा औद्योगिक, सांस्कृतिक परंपरांचा इतिहास असतो .